# नियमित दिवाणी दावा क्रमांक ११८/२०११ मधील निशाणी ८५ खालील आदेश

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादीविरूध्द दाखल केला आहे. वादीने अशा प्रकारे मागणी केली आहे की प्रतिवादी कमांक १३ब चे पालक म्हणून प्रतिवादी कमांक २७ ची नियुक्ती करण्यात यावी आणि प्रस्तुत दाव्याचे समन्स प्रतिवादी कमांक १३ब चया वतिने प्रतिवादी कमांक २७ ला जारी करण्यात यावे.

२. प्रस्तुतच्या अर्जाची थोडक्यात वस्तुस्थिती अशा प्रकारे आहे की, वादी कथन करतात की प्रतिवादी कमांक १३ब ही अज्ञान आहे हे बेलीफने दाखल केलेले अहवालनुसार स्पष्ट झालेले आहे आणि त्यामुळे अज्ञान प्रतिवादी कमांक १३ब चे पालक म्हणून प्रतिवादी कमांक २७ ची नेमणूक होणे योग्य होणार आहे आणि ही नेमणूक दावा चालविण्यासाठी महत्वाची आहे कारण प्रतिवादी कमांक १३ब चे प्रतिवादी कमांक २७ हे नात्याने काका आहेत आणि तेच प्रतिवादी कमांक १३ब चा सांभाळही करतात. वादीने मागणी केली आहे की प्रतिवादी कमांक १३ब चे पालक म्हणून प्रतिवादी कमांक २७ ची नेमणूक करण्यात यावी आणि प्रस्तुतच्या दाव्याचे समन्स प्रतिवादी कमांक १३ब तर्फे प्रतिवादी कमांक २७ ला जारी करण्यात यावे. वादीने विनंती केली आहे की प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात यावा. म्हणून प्रस्तुतचा अर्ज.

३. प्रतिवादी कमांक ३ व ४ ने म्हणणे निशाणी ८८ ला दाखल केले आहे. प्रतिवादी कमांक ३ व ४ ने प्रस्तुतच्या अर्जाला जोरदार विरोध केला आहे. हया प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादीने दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज हा संपूर्णपणे खोटा

व लबाडीचा आहे कारण प्रतिवादी कमांक १३ब ही अज्ञान व्यक्ती नसून ती सज्ञान व्यक्ती आहे आणि त्यामुळे प्रतिवादी कमांक २७ ची नियुक्ती पालक म्हणून प्रतिवादी कमांक १३ब साठी करता येणार नाही. प्रतिवादी कमांक ३ व ४ ने मागणी केली आहे की प्रस्तुचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे. प्रतिवादी कमांक ३ व ४ ने विनंती केली आहे की प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. प्रस्तुतच्या अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांच्या वकिलांना ऐकले. युक्तीवाद व पुरावा विचारात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निकालासाठी माझ्या विचारार्थ आले आहेत.  मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालील प्रमाणे नमूद केले आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सिध्द करतात का की प्रतिवादी कमांक १३ब ही अज्ञान असल्यामुळे प्रतिवादी कमांक १३ब साठी पालक म्हणून प्रतिवादी कमांक २७ काकाची नेमणूक होणे आवश्यक आहे? | होकारार्थी |
| २. | कोणता आदेश ? | अर्ज मंजूर |

## **का र ण मि मां सा**

**मुद्दा क्रमांक 1 करिताः-**

५. दोन्ही पक्षकारांच्या वकिलांना ऐकले. वादीचे वकिलांनी युक्तीवादामध्ये प्रतिपादन केले की प्रतिवादी कमांक १३ब अज्ञान आहे असे बेलीफने दिलेले अहवाल नुसार स्पष्ट झालेले आहे आणि म्हणून प्रतिवादी कमांक २७ जे प्रतिवादी कमांक १३ब चे नात्याने काका आहेत त्यांनी प्रतिवादी कमांक १३ब साठी प्रस्तुतचा दावा चालविण्याकामी नियुक्ती होणे आवश्यक आहे. प्रतिवादी कमांक ३ व ४ च्या वकिलांनी युक्तीवादामध्ये प्रतिपादन केले आहे की प्रतिवादी कमांक १३ब ही अज्ञान

नाही आणि ती एक वयाने मोठी व्यक्ती आहे आणि त्यामुळे प्रतिवादी कमांक २७ ची नेमणूक प्रतिवादी कमांक १३ब साठी करता येणार नाही. दोन्ही पक्षकरांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकता आणि दस्तऐवजी पुरावा बेलीफ अहवालाचे अवलोकन केल्यानंतर स्पष्ट होतेकी बेलीफ अहवाल नुसार प्रतिवादी १३ब ही अज्ञान व्यक्ती आहे आणि म्हणून असा निष्कर्ष काढण्यास काहीच हरकत नाही की प्रतिवादी कमांक २७ जे प्रतिवादी कमांक १३ब चे काका आहेत त्यांची नेमणूक पालक म्हणून प्रतिवादी कमांक १३ब साठी करण्यात आली तर प्रस्तुतचा दावा चालविण्यासाठी प्रतिवादी कमांक १३ब च्या हिताचे होणार आहे आणि त्यामुळे प्रतिवादी कमांक २७ ला प्रतिवादी कमांक १३ब ची पालक म्हणून नियुक्ती होण्यास काहीच कायदेशीर अहचण दिसून येत नाही आणि त्यास दुजोरा मिळणारा पुरावा बेलीफ अहवाल आहे. सबब माझे उत्तर मुद्दा कमांक १ ला होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ करिता:-</u>

६. मुद्दा कमांक १ चे होकारार्थी निष्कर्ष विचारात घेता स्पष्ट होते की वादीने मागणी केलेली दाद की अज्ञान प्रतिवादी कमांक १३ब साठी दावा चालविण्यासाठी प्रतिवादी कमांक २७ ची नेमणूक पालक म्हणून करण्यात यावी व प्रतिवादी कमांक २७ ला प्रतिवादी कमांक १३ब तर्फे समन्स व नोटीस जारी करण्यात यावी ही दाद मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा कमांक २ च्या उत्तरास मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर.

२. प्रतिवादी कमांक २७ ची नेमणूक पालक म्हणून प्रतिवादी कमांक १३ब साठी प्रस्तुतचा दावा चालविण्यासाठी करण्याची परवानगी वादीला देण्यात

आली आहे.

३. प्रस्तुतचे दाव्याचे समन्स प्रतिवादी कमांक १३ब च्या वतिने प्रतिवादी कमांक २७ ला जारी करण्यात यावे.

सही/-

तारीख: २६/४/२०१६

(वै.म. गोतसुर्वे)
सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
इस्लामपूर